**अत्यंत महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/३/कावि/ ३७ /२०१६
दिनांक - ०५/२/२०१६

**विषय :- "आपले सरकार" पोर्टलवरील तक्रारींबाबत जिल्हास्तरीय आढावा बैठकीस उपस्थित राहणेबाबत...**

**परिपत्रक,**

महाराष्ट्र शासनातर्फे महानगरपालिका स्तरावरील तक्रारींचे निराकरण होणेकामी दि. १५ ऑगस्ट २०१५ पासून **"आपले सरकार"** पोर्टल सुरू करण्यात आलेले आहे. यामध्ये महानगरपालिकेस ऑनलाईन तक्रारी प्राप्त होत असून संबंधित विभागांनाही ऑनलाईन तक्रारी पाठविल्या जातात. याद्वारे प्राप्त होणा-या तक्रारींकरिता २१ दिवसांची अंतिम मुदत असलेबाबत यापुर्वीच सर्व विभाग / विभागप्रमुखांना कळविणेत आलेले आहे. "आपले सरकार" पोर्टलवर प्रलंबित असलेल्या तक्रारींचा आढावा प्रत्येक आठवड्याला मा. मुख्यमंत्री यांचेमार्फत घेतला जात असून प्रलंबित प्रकणांबाबत त्यांचे कार्यालयाकडूनही वेळोवेळी विचारणा होते.

"आपले सरकार" पोर्टलवरील प्रलंबित तक्रारींबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फतदेखील दरमहा आढावा घेतला जात असून **यापुढे ज्या विभागांकडे २१ दिवसांपेक्षा जास्त कालावधीच्या तक्रारी प्रलंबित राहतील त्यांचे विभागप्रमुखांना जिल्हास्तरीय आढावा बैठकीस उपस्थित राहून प्रलंबित तक्रारींबाबतचा खुलासा करावा लागणार आहे**. त्यामुळे "आपले सरकार" पोर्टलवरील तक्रारींवर विभागाने प्राधान्याने कार्यवाही करून नागरिकांस कळविणे बंधनकारक आहे. तसेच २१ दिवसांपेक्षा जास्त दिवस तक्रार प्रलंबित राहणार नाही याची दक्षतादेखील संबंधित विभागप्रमुखाने घ्यावयाची आहे.

सदर कामकाजामध्ये टाळाटाळ अथवा दिरंगाई आढळून आल्यास संबंधित विभागप्रमुखास जबाबदार धरून त्यांचेवर पुढील प्रशासकीय कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी. जिल्हास्तरीय आढावा बैठकीची तारीख व वेळ माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत वेळोवेळी संबंधित विभाग / विभागप्रमुखांना कळविणेत येईल.

(राजीव जाधव)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत :- सर्व विभाग/ विभागप्रमुख

---------------------------------

---------------------------------